**प्रेसनोट दि.२७/०४/२०१९**
**भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे**
**हरविलेल्या मुलास त्याच्या आई-वडीलांचा शोध घेवुन त्यांचे ताब्यात दिलेबाबत**

दि. २६/०४/२०१९ रोजी सकाळी १०/०० वाजणेच्या दरम्यान भारती विद्यापीठ पोलीस ठाणे हद्दीतील दत्तनगर मार्शल पोना ६८०६ पवार व पोशि ७४८२ कातांगळे असे पेट्रोलिंग करीत असताना भारती विद्यापीठ वाहतुक शाखेचे कर्मचारी पोशि केंद्रे यांनी ते दत्तनगर चौकात वाहतुक नियमन करत असताना, त्यांना एक वय-०४ वर्षे वयाचा मुलगा रडत व फिरत असताना मिळुन आल्याने त्यास त्यांचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांस काहीएक सांगता येत नसल्याने नमुद पोलीस कर्मचा-यांनी बिट मार्शल यांचे ताब्यात दिले.

नमुद मुलास पोलीस चौकीस आणुन सपोफौ अनिल शिंदे, पोशि २८९९ रविंद्र भोरडे, पोशि ९९८५ मांडगे व नमुद बिट मार्शल पोना ६८०६ पवार व पोशि ७४८२ कातांगळे यांनी ओळखीच्या निपाणे वस्तीमधील लोकांच्या वॉट्सअपग्रपवर नमुद मुलाचा फोटो पाठवुन सदर लहानमुलांबाबत माहिती मिळाल्यास पोलीस चौकी किंवा पोलीस ठाणेस कळविण्याची विनंती केली.

तसेच नमुद अधिकारी व कर्मचारी या सर्वानी मुलगा मिळुन आलेल्या भागात मुलासह पेट्रोलिंग करुन त्या मुलाचे आई-वडीलांबाबत चौकशी केली असता, निपाणे वस्तीमधील लोकांच्या वॉट्सअपग्रपवर पाठविलेल्या फोटोच्या ग्रुपवरील एका इसमाने सदरच्या मुलास ओळखत असल्याचे सांगुन, त्यांच्या आई-वडीलांना समक्ष पोलीस चौकीस घेऊन आले. नमुद मुलाचे आई-वडीलाकडे चौकशी करतो तो घराबाहेर खेळत असताना दत्तनगर चौकाच्या दिशेने आला. पोलीस अधिकारी कर्मचारी यांना नमुद महिला व पुरुष ही हरविलेल्या मुलाची आई-वडील असल्याची खात्री केली. त्यानां त्याचे नाव व पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव अजित कुमार जैस्वाल, वय-३० वर्षे, धंदा-गिरण, रा. लिपाणे वस्ती, जाभुंळवाडी रोड, आंबेगांव खुर्द, असे सांगुन मुलाचे नांव आदित्य कुमार, वय-०४ वर्षे असल्याचे सांगितले. नमुद मुलास पोलीस चौकीचे तसेच वाहतुक शाखेकडील कर्मचा-यांनी त्याचे आई-वडीलांचे ताब्यात दिले.

सदर कामगीरीबाबत चुकलेल्या मुलाचे वडील अजित कुमार जैस्वाल यांनी समाधान व्यक्त करुन पोलिसांचे आभार मानलेले आहे.

